महाराष्ट्र शासन
# शासकीय दंतमहाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
# Government Dental College & Hospital, Nagpur
Govt. Medical College Campus, Medical Square, Nagpur - 440003, M.S. (INDIA)
Telephone No. 0712- 2743400 /2744496 Fax No. 0712- 2743400
Email - dean.gdcngp@gmail.com GSTIN 27AAAGD1499M1Z1

जा.क्र.शादंमरुना/खरेदी विभाग/ दरपत्रके / २६२ /२०२६ दिनांक :२०/०१/२०२६

विषय:- दरपत्रके मागविणेबाबत.....

संदर्भ:- या कार्यालयीच मंजूर टिप्पणी. दि. २०/११/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये,अत्यंत तातडिची महाविद्यालय/रुग्णालयाची निकड भागविण्यासाठी व राज्य योजनातुन मंजुर करण्यात आलेल्या अनुदानाचा शासकीय नियमानुसार विनियोग करण्यासाठी अतितात्काळ बाब म्हणून दरपत्रके दोन लिफापयात (तांत्रिक व व्यापारी) मागवित आहोत, सदरील दरपत्रकांची अंतिम मूदत दि.२८/०१/२०२६ राहिल.

यादी :-

| अनू.क्र | यंत्र किंवा साधन सामुग्रीचे नाव (Name of Particular/Item) | विवरण (Specification) | Rate per unit with GST |
|---|---|---|---|
| १ | N२O Cylinder | Jumbo ४६.०७ ltr | |
| २ | O२ Cylinder | Jumbo ४६.०७ ltr | |
| ३ | Nitrous Oxide Cylinder | N२O- D or E Type Cylinder, १.७८m³, Pin Index type,५ Liter | |
| ४ | oxygen Cylinder | D or E Type Cylinder, १.०m³, Pin index type, ५ Liter | |

अटी व शर्ती:-

१) दरपत्रक धारकाने मुंबई व संस्था अधिनयम १९४८ च्या अंतर्गत नोदणी अद्यावत नोंदणीकरण असल्याचा दाखला/प्रमाणपत्र जोडावे. (लागू असल्यास).

२) अन्न व औषधे प्रशासन यांचे वैध प्रमाणपत्र जोडावे. (लागू असल्यास).

३) दरपत्रक धारकाने पॅन क्रमांक प्रमाणपत्राची व जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची स्वयंसाक्षाकित प्रत जोडावी. (लागू असल्यास)

४) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र तसेच ३१ मार्च २०२५ कर भरणा केल्याची चलन प्रत सोबत जोडावी.

५) दरपत्रक सादर करताना दरपत्रकांच्या दुकानाचे नाव, दुकानाचा फोटो, संपुर्ण पत्ता, नोदणी क्रमांक, जीएसटी व पैन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सही व शिक्का असलेली दरपत्रके सादर करण्यात यावेत.

६) दर हे सर्व करासहित नमूद करावेत. बाजार भावापेक्षा जास्त दर सादर करण्यात येऊ नये. तसेच सर्व सामुग्री स्वतः स्वखर्चाने वीस दिवसाच्या आत भांडार विभागात पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही. तसेच मेलवर प्राप्त झालेल्या आदेशास दोन दिवसात मेलद्वारे पुरवठ्याची हमी द्यावी लागेल. दिरंगाईने पुरवठा केल्यास दर अठवडयाला आदेशाच्या ०.५% दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल

७) दर हे पेनाने लिहिण्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्द करण्यात येईल. हस्तलिखित दरपत्रके पुर्वसूचना न देता रद्द करण्यात येतील तसेच दरपत्रकात व देयकांमध्ये Generic Name/Chemical Name यादीप्रमाणे नमूद करावे. Brand Name चालणार नाही. (लागू



Scanned with OKEN Scanner

असल्यास).

८) दरपत्रकाच्या मोहरबंद लिफाफ्यावर सामुग्रीचे दरपत्रक असे नमूद करण्यात यावे. व मोहरबंद लिफाफ्यावर दुकानाचे नाव, संपूर्ण पत्ता, मोबाईल नंबर लिहिण्यात यावा.

९) दरपत्रक हे दोन लिफाफ्यात (तांत्रिक व व्यापारी) सादर करावे, तांत्रिकदृष्टा पात्र असलेल्या पुरवठादारांचेच व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

१०) तांत्रिक लिफाफामध्ये दरपत्रक असलेल्या पुरवठादारांना अपात्र ठरविण्यात येईल.

११) प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

१२) पुरवठा करण्यात येणारे सामुग्री हे वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे व जवळील मुदतबाह्य नसावे, हलक्या किंवा निकृष्ट दर्जाची असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. पुरवठ्यासोबत देयक । Analysis Report सादर करावा.

१३) खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत तसेच आणि इच्छूक संस्थेचे एकल दरपत्रक देण्याबाबत "दरपत्रक धारकाची हमी असे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

१४) काही तांत्रिक कारणास्तव दरपत्रके स्विकारणे अथवा कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरितांनी राखून ठेवला आहे.

१५) सदरील दरपत्रकाबाबत काही तक्रार असल्यास रु. २५०००/- (पंचवीस हजार फक्त) धनादेश मा. अधिष्ठाता यांचे नावे जमा केल्यानंतरच तक्रार स्विकारण्यात येईल.

१६) उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच दरपत्रके सादर करावे.

१७) Non-Conviction Certificate by FDA Issued for manufacturer/Distributor (लागु असल्यास)

१८) उपरोक्त दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्या बाबत स्वघोषणा पत्र सादर करावे.

१९) उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादर करावे.

२०) दरपत्रकात पुरवठाधाराने स्वतःच्या कोणत्याही अटी व शर्ती नमूद करु नये. अटी व शर्ती नमूद केलेले दरपत्रके ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

२१) मागविण्यात आलेले दरपत्रके स्विकारणे,उघडणे किंवा कोणत्याही पुर्वसुचना न देता निवीदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत. याबाबत आपली कोणतीही तक्रार ग्राहय धरल्या जाणार नाही.

२२) यंत्रसामुग्रीचा करारनामा करत असतांना पहिल्या १० लाखापर्यंत रुपये ५००/- च्या मुद्रांकावर व त्यापुढील प्रत्येक ०१ लाख रकमेस अतिरिक्त रुपये १००/- चे मुद्रांक देणे बंधनकारक राहील.

२३) निवीदेचा निकाल अधिसूचीत करण्यात आल्यानंतर निवीदाकारकाने १५ दिवसाच्या आत आदेशाच्या मूल्याच्या तीन ३% ( Security Deposit ) अनामत रक्कम या कार्यालयास कोणत्याही अनुसूचीत वाणिज्यिक बॅक/राष्ट्रीकृत बॅकतील कराराच्या कालावधीत वैध राहणा-या बॅन्केच्या हमीव्दारे देण्यात यावे. तसेच नमूद केलेल्या वॉरंटी कालावधी संपेपर्यंत अनामत रक्कत परत करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय
नागपुर.

प्रत :- १. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर या संस्थेचे संकेतस्थळ,
२. नोटीस बोर्ड शादंमवरु नागपूर.

Q-2025-26

Scanned with OKEN Scanner